# महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास आरक्षणासाठी समर्पित आयोग

क.क्र. ११५, पहिला माळा, ए १ इमारत, वडाळा टर्मिनल, वडाळा आर टी ओ जवळ,
वडाळा, मुंबई-४०० ०३७.

MS/DCBCCMH/२०२२/८४ दिनांक : १८ एप्रिल २०२२

## सार्वजनिक सूचना

माननीय सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९८०/२०१९ मध्ये दिनांक ०४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्र. १२ मध्ये, राज्यातील नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय राजकीय मागासलेपणाच्या स्वरूपाची व परिणामांची समकालीन अनुभवधिष्ठित सखोल चौकशी करण्यासाठी समर्पित आयोग स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने दि. ११ मार्च २०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे **"महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास आरक्षणासाठी समर्पित आयोग"** घटित केलेला आहे. सदर आयोग, दिलेल्या कार्यकक्षेप्रमाणे, स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय राजकीय मागासलेपणाच्या स्वरूपाची व परिणामांची समकालीन अनुभवधिष्ठित सखोल चौकशी करण्याच्या अनुषंगाने नागरिकांकडून, संस्थांकडून, संघटनांकडून व नोंदणीकृत राजकीय पक्षांकडून अभिवेदन/सूचना मागवित आहे.

आपले अभिवेदन/सूचना लेखी स्वरूपात कृपया खालील ई-मेल/WhatsApp क्र./पत्त्यावर दिनांक १० मे २०२२ पर्यंत पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

| | |
|---|---|
| ई-मेल | dcbccmh@gmail.com |
| WhatsApp क्र. | +912224062121 |
| आयोगाचा पत्ता | क. क्र. ११५, पहिला माळा, ए १ इमारत, वडाळा टर्मिनल, वडाळा आर टी ओ जवळ, वडाळा, मुंबई - ४०० ०३७ |

सदस्य सचिव
समर्पित आयोग

(Dgipr No. 2022-23/C-199)